प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जरंडेश्वर शुगर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड, मुक्काम पोस्ट-चिमणगाव, तालुका-कोरेगाव, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार १०,०००.० टन/प्रतिदिन ते १५,०००.० टन/प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प ३२.० मेगावॅट प्रतिदिन वरुन ५२.० मेगावॅट पर्यत आणि मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प § ८०.० केएलपीडी ते ३००.० केएलपीडी प्रकल्पांच्या विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जरंडेश्वर शुगर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड, मुक्काम पोस्ट-चिमणगाव, तालुका-कोरेगाव, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार १०,०००.० टन/प्रतिदिन ते १५,०००.० टन/प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प ३२.० मेगावॅट प्रतिदिन वरुन ५२.० मेगावॅट पर्यत आणि मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प § ८०.० केएलपीडी ते ३००.० केएलपीडी प्रकल्पांच्या विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, सातारा यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ७०/२०२१ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०९०३ एफटीएस ०००७ दिनांक ०३ सप्टेंबर, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,सातारा<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | अध्यक्ष |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - | सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>सातारा | - | आयोजक |

श्री एल. एस. भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुनील थोरवे, अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री नितीन शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री भड, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जरंडेश्वर शुगर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड, मुक्काम पोस्ट-चिमणगाव, तालुका-कोरेगाव, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार १०,०००.० टन/प्रतिदिन ते १५,०००.० टन/प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प ३२.० मेगावॅट प्रतिदिन वरुन ५२.० मेगावॅट पर्यत आणि मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प § ८०.० केएलपीडी ते ३००.० केएलपीडी प्रकल्पांच्या विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये सर्व उत्पादनांसाठी एकत्रित - **श्रेणी अ मध्ये** [साखर उत्पादनासाठी - ५ (जे), मळी आधारित आसवणी प्रकल्पासाठी - ५ (जी) व सहविद्युत प्रकल्पासाठी - १ (डी)] मोडत आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि जल वायू परिवर्तन विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची

ऑनलाईन परवानगी दिनांक १०-०८-२०२१ रोजी मागितली व सदरहू विभागाने दिनांक २४-०८-२०२१ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांनी स्थानिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सातारा, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सातारा, तहसीलदार, कोरेगाव, तहसील कार्यालय-कोरेगाव, जिल्हा -सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय - मुक्काम पोस्ट- चिमणगांव, जिल्हा - सातारा, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय -मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सातारा, व मप्रनि मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत स्थानिक उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, सातारा यांना ईमेलव्दारे/लेखी श्री सुनंदा रेड्डी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण संस्था, शिवाजीनगर, नालगोंडा जिल्हा, एच. मधुबाबू,रुरल एन्व्हॉयर्नमेंट एज्युकेशन एण्ड हेल्थ अवेअरनेस सोसायटी, मुर्शीदाबाद, हैद्राबाद, ए. सुदर्शन, एनजीओ, सरपंच, चिमणगाव ग्रामपंचायत, तालुका-कोरेगाव, जिल्हा-सातारा यांच्याकडून प्राप्त झाले.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले. श्री भड यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरणविषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत माहिती देताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तक विविध पर्यावरण संरक्षण सयंत्रणेसाठी भांडवली गुंतवणूक एकूण रुपये ६,०२०/-लाख करणार असून वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी ६२१.० लाख खर्च करणार आहेत. त्यांनी सांगितले की नवीन सांडपाणी प्रकल्पासाठी रुपये ६५०/- लाख खर्चाची तरतुद करण्यात आलेली आहे.

- प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल. प्रकल्पातील हवा प्रदूषणाच्या संरक्षणासाठी अत्यंत आधुनिक अशी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर अशी सयंत्रणा कार्यान्वित करण्यात

येणार आहे. सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार असून परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात भरपूर फायदा होणार आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले सदरहू प्रकल्प विस्तारिकरण कार्यरत प्रकल्प स्थानावरच करणार असल्याने विस्तारिकरणासाठी अतिरिक्त जमिन लागणार नाही. ऊसामध्ये ७०% पाणी असते. उत्पादन प्रकियेत उत्पन्न् झालेले सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्यात येणार आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रश्नकर्त्याने आपले संपूर्ण नांव व पता सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला-

१) श्री.सुहास मानवकर, राहणार- तालुका - कोरेगाव, जिल्हा -सातारा-

या विस्तारिकरण प्रकल्पास रोज किती लिटर पाणी लागू शकेल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आपण जे पाणी म्हणता ते पाणी आम्ही नदीतून उचलतो त्याचा परिणाम गावातील पिण्याच्या पाण्यावर, शेतीवर किंवा औद्योगिक वापरावर होऊ शकतो. सादरीकरणात दाखविल्याप्रमाणे प्रकल्पात रोज फक्त १००.० घनमीटर पाणी लागेल. त्या १००.० घनमीटर पाण्यापैकी ९८.० घनमीटर पाणी उसातील घेणार असून त्या पाण्याचा पुनर्वापर करणार आहोत. फक्त २% पाणी आम्ही घेणार आहोत, जे पिण्यासाठी लागेल. कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी-कर्मचारी निवासी वसाहत, कामगार यांना पिण्याचे पाणी देण्यासाठीच ते वापरले जाईल.

त्याचप्रमाणे आसवणी प्रकल्पातील स्पेंट वॉशमधील पाणी काढणार आहोत. अगदी बिना गळीत हंगाम असल्यास १५ लीटर व गळीत हंगाम चालू असताना ०२ लीटर पाणी लागेल. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की अतिशय उत्कृष्ट असे वॉटर मॅनेजमेंट (पाणी व्यवस्थापन) या प्रकल्पात राबववित आहोत.

२) श्री संजय लक्ष्मण पिसाळ, राहणार-भीमा कोरेगाव,जिल्हा-साताराः-

या प्रकल्प विस्तारिकरणामुळे आजूबाजूच्या परिसराला काय फायदा होणार आहे? त्याचप्रमाणे प्रकल्पात बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहे काय?

सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे १२५ लोकांना प्रत्यक्ष रोजगार प्रकल्पात मिळणार आहे. मात्र परिसरातील व्यवसायात अप्रत्यक्षपणे भरपूर वाढ होईल. चहा, पानाची टपरी, हॉटेल व्यवसाय, रिक्षा व्यवसाय यात वाढ होईल. हा शेतक-यांच्या फायद्याचा प्रकल्प आहे. आसवणी प्रकल्पातील अतिरिक्त उत्पन्नामुळे ऊसाला रास्त भाव देण्यात येईल.

३) <u>श्री संतोष नलावडे- , राहणार - कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>

चर्चा करताना वाहतुकीचा मुद्दा आला होता. कोरेगाव शहरातून आतापर्यंत ऊसवाहतुक होत होती. प्रकल्प विस्तारिकरणमुळे कोरेगावातून जी ऊसवाहतुक होत होती, त्यावर ताण पडणार आहे. त्यावर आपण काय उपाययोजना करणार आहात?

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की सर्वांचे प्रश्न एकदम घेण्यात यावे. त्याचप्रमाणे पर्यावरणीय प्रश्नांशिवाय इतर प्रश्न कार्यालयात चर्चेने सोडवावेत.

४) <u>श्री सुनिल शिर्के, राहणार - कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>

प्रकल्पात ६५.० लिटर प्रति टन सांडपाणी निर्माण होईल. स्पेंटवॉशमधील पाणी काढून त्या पाण्याचा प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे स्पेंट वॉशचे प्रमाण कमी होते. उरलेला स्पेंट वॉश हा जाळण्यात येणार आहे. आसवणी प्रकल्पातील सी.पी.यु. (CPU) व प्रोसेस कंडेन्सेट ट्रिटमेंट प्लँट (PCTP-RO Based) मुळे सांडपाण्याचा १००% पुनर्वापर होतो.

५) <u>श्री.सागर आनंदाराव साळुंखे, कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>

विस्तारिकरणानंतर प्रकल्पात दररोज कोणते आणि किती पदार्थ तयार होणार?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की विस्तारिकरणानंतर प्रकल्पात बगॅस, अल्होकोल, प्रेसमड, वीज तयार होईल. जे पदार्थ तयार होत आहेत, त्यापेक्षा जास्त प्रमाणात तयार होतील.

६) <u>श्री चंद्रकांत बर्गे, कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>

सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी प्रक्रीया करुन उत्पादन प्रक्रियेत व हरितपट्टा विकसनासाठी वापरण्यात येणार आहे. तर त्या सांडपाण्यात कोणातही केमिकल नाही, हे तपासणारी काही यंत्रणा आहे काय? तर यावर तपासणी आणि देखरेख ठेवण्यासाठी एक लोकनियुक्त समिती आवश्यक नाही का?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित आहे. ज्याप्रमाणे हवा प्रदूषण तपासण्यासाठी ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा असते, त्याचप्रमाणे सांडपाणीही तपासले जाते. त्यामुळे प्रक्रिया करुन सोडलेल्या सांडपाण्यावर सतत लक्ष असते. त्याचप्रमाणे दरवर्षी जसे आपण आयकर परतावा भरतो, त्याचप्रमाणे दरवर्षी प्रत्येक प्रकल्पाचे Environment Audit करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे म.प्र.नि.मंडळातर्फे वेळोवेळी तपासणी ही करण्यात येते. त्याचप्रमाणे जर एखाद्या ठिकाणाहून तक्रार नोंदविल्यास तेथील पाण्याचा नमुना गोळा केला जातो.

७) <u>श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, पर्यावरण परिरक्षणा संस्था, शिवाजीनगर, नालगोंडा जिल्हा, तेलंगण राज्यः-</u>

श्री सुनंदा रेड्डी यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे विस्तारीकरण हाती घेतल्याबद्दल अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की ते भारतातील पहिले पर्यावरणवादी आहेत की जे प्रकल्पास पाठिंबा देतात. भारतातील बरेच पर्यावरणवादी प्रकल्पांना विरोध करतात, मात्र मी प्रकल्पास पाठिंबा देतो. माझ्या मते बेकारी हे सर्वात जास्त सामाजिक प्रदूषण आहे. भारतात १८ ते ३५ वयोगटातील सुमारे ४० कोटी बेकार असताना त्यांना नोकरीची संधि मिळणे गरजेचे आहे. शासकीय नोक-या सर्वांनाच मिळत नाहित. केंद्र आणि राज्ये सरकारे फक्त ५६० लाख लोकांच नोक-या मिळतात. त्यामुळे इतर लोकांना खाजगी कंपन्यांमध्येच नोक-या मिळतात. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री रेड्डी यांना सूचना केली की फक्त या प्रकल्पाविषयीस काही सूचना वा आक्षेप नोंदवावेत.

त्यांनी सांगितले की ते काही सूचना देऊ इच्छितात-

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरणाचे पाणी, जमिन, हवा यांचे योग्य प्रकारे सर्वेषण केले, त्याबद्दल त्यांनी पर्यावरण सल्लागार यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे प्रकल्पाच्या १० कि. मी. परिघातील माझी सूचना आहे की परिसरातील आरोग्य, पीकउत्पादन, भूजल व शैक्षणिक सर्वेषण करण्यात यावे, त्याचा डेटा गोळा करण्यात यावा.

त्यांनी सांगितले पावसाचे पाणी वाचविण्यासाठी मोठी साठवण करण्याचे प्रयत्न करण्यात यावेत.(Water Harvesting Stretch) पाणी हा मर्यादित स्रोत आहे.

श्री रेड्डी यांनी अतिशय सुंदर हरितपट्टा प्रकल्पात विकसित केल्याबद्दल कारखाना प्रशासनाचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की ब-याच वेळा मी हरित पट्टा विकसित करताना फळझाडे आणि औषधी वनस्पती अधिक प्रमाणात लावण्याची सूचना करतो.

स्थानिक युवक व युवतींना रोजगार मिळण्यासाठी सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेण्याची सूचना केली. त्यामुळे स्थानिकांना आपल्या प्रकल्पात किंवा इतर ठिकाणी रोजगाराची संधि मिळेल.

त्यांनी सूचना केली की विशिष्ट कालावधीनंतर आरोग्य शिबिर आयोजित करण्यात यावे,

श्री रेड्डी यांनी सीएसआर निधी हा ग्रामीण प्राथमिक शिक्षणासाठी ब-याचप्रमाणात खर्च करण्यात यावा अशी सूचना केली आणि पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस प्रकल्पास विना हरकत त्वरित मान्यता देण्याची सूचना महाराष्ट्र शासनास केली.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करतेवेळी सर्वेषण करताना आम्ही प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या होत्या. हरित पट्टा विकसित करताना असाच अभ्यास करण्यात आला.पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री रेड्डी यांनी कौशल्यविकासाबाबत सूचना रास्त आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पात औद्योगिक सुरक्षितता अत्यंत महत्वाची आहे.

८) <u>ए.वेंकटेश रेड्डी, एन.जी.ओः-</u>

प्रकल्प हे देशाचे पाठीचे कणा आहेत. त्यामुळे देशाला आर्थिक स्थैर्य प्राप्त होते. त्यामुळे प्रकल्पास सर्वजण पाठिंबा देतात. प्रकल्पास माझा पाठिंबा असून पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस प्रकल्पास विना हरकत त्वरित मान्यता देण्याची सूचना महाराष्ट्र शासनास केली.

९) <u>श्री मंगेश क्षिरसागर, राहणार-कुमठे, तालुका-कोरेगांव, जिल्हा-साताराः-</u>

विस्तारीकरणामुळे प्रकल्पात ध्वनी व हवेचे प्रदूषण होईल काय? त्यासाठी प्रकल्प व्यवस्थापनाने काय उपाययोजना नियोजित केलेल्या आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासाठी तयार करताना ध्वनी प्रदूषणाची पातळी तपासण्यासाठी सर्वेषण करण्यात आलेले आहे. त्यात कुठलेही उल्लंघन नाही. हवेचा प्रदूषणाचा इडेक्स दाखविलेला आहे. त्यामुळे स्थानिकांनी याबाबत कोणतही भिती ठेऊ नये.

१०) <u>एस.चंद्रसेखर, पर्यावरणवादी एन.जी.ओ.-</u>

कंपनीने सीएसआर निधी स्थानिकाच्या उपयोगासाठी आणणयात यावा. स्थानिकांना रोजगारात भरपुरी संधी दया. प्रकल्पास पाठिंबा.

११) श्री रमेश देशमाने.

प्रस्तावित प्रकल्पात हरित पट्टा विकसित करण्यासाठी आपण काय उपाययोजना केलेल्या आहेत?

हरितपट्टा विकसनाचे नियम प्रथम १९९५ साली आले. त्याअगोदर प्रत्येक प्रकल्प प्रवर्तक नुसतीचे झाडे लावत असत. आता प्रकल्पात ३३% झाडे लावलेली असून तो ४०% करण्याचा आमचा मानस आहे.

१२) <u>श्री सुभाष अशोक माने, रहिमतपुर, जिल्हा-साताराः-</u>

ह्या प्रस्तावित प्रकल्पातून घ़न कचरा तयार होऊ शकतो काय? होणार असल्यास त्यावर कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे. विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिली घनकचरा राखेच्या स्वरुपात होतो. दोन प्रकारची राख तयार होते. बगॅसची राख आणि स्पेंट वॉशची राख. बगॅसची राख ही बायोमास आहे. त्यामुळे ती खत म्हणून वापरता येते. स्पेंट वॉशच्या राखेत एनपीके चांगले असतात, त्यात सिलिका चांगले असल्याने ती वीटा तयार करण्यास वापरता येऊ शकते. अशा प्रकारे घन कचरा व्यवस्थापन करण्यात येईल.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याची सूचना केली. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांना प्राप्त झालेले लेखी सूचना, आक्षेप बैठकीचे इतिवृत्त, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने आणि जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येतील. त्याचप्रमाणे चिमणगाव ग्रामपंचायतीने अदा केलेले ना हरकत प्रमाणपत्रही सादर करण्यात येईल.

बैठकीचा समारोप करताना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक आणि राष्ट्रीय वृत्तपत्रात जाहिर सुचना देण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे अधिसूचित शासकीय कार्यालयात कार्यकारी सारांश अहवालाची मराठी आणि इंग्रजी प्रत उपलब्ध करण्यात आलेली होती. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, प्राप्त झालेले लेखी आक्षेप,बैठकीचे इतिवृत्त व बैठकीची संपूर्ण व्हिडिओ पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. पुढील निर्णय तेथील तज्ज्ञ समिती घेईल. सदरहू इतिवृत्त म.प्र.नि. मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि माननीय अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

सोबत १६ लेखी निवदने जोडत आहेत.

(एल. एस. भड)
आयोजक,
पर्यावरणविषयकजाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, सातारा

(नितीन शिंदे)
सदस्य,
पर्यावरणविषयकजाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे

(सुनील थोरवे)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा,
जिल्हा-सातारा